IMPACT FACTOR (SJIF) 2021= 7.380 ISSN 2319-4766

AN INTERNATIONAL PEER REVIEWED & REFEREED JOURNAL

**SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES**

APRIL-JUNE,2022, VOL - 10, ISSUE - 53

मुंबई विद्यापीठ संलग्नित

रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीचे

**आर. पी. गोगटे कला व विज्ञान आणि आर. व्ही. जोगळेकर वाणिज्य महाविद्यालय, रत्नागिरी**

आणि

**मराठी समाजशास्त्र परिषद**

दिनांक 11-12 एप्रिल 2022

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

## मराठी समाजशास्त्र परिषदेचे 31 वे राष्ट्रीय अधिवेशन

# भारतीय समाज आणि विकास प्रक्रिया

**संयोजक**

**समाजशास्त्र विभाग**

**गोगटे जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी**

मुख्य संपादक

डॉ . पी . पी . कुलकर्णी

प्राचार्य . गोगटे - जोगळेकर महाविद्यालय ,रत्नागिरी

संपादक

प्रा . शिवाजी अशोक उकरंडे

सहाय्यक प्राध्यापक

समाजशास्त्र विभाग गोगटे-जोगळेकर महाविद्यालय,रत्नागिरी



| | RC 03 | 123-204 |
|---|---|---|
| 24 | लिंगभाव आणि पुरुषसत्ताकता<br>*प्रा. डॉ. रजनी कारदगे* | 123-125 |
| 25 | धर्मातील स्त्रियांचे स्थान<br>*प्रा. संभाजी शंकर कांबळे* | 126-128 |
| 26 | दलित समाजातील महिला उद्योजक: विषमता आणि तुरळकतेचे विश्लेषण<br>*तेजस्विनी सोनवणे* | 129-134 |
| 27 | रत्नागिरी जिल्ह्यातील मत्स्यविक्री करणाऱ्या स्त्रियांचा सहभाग आणि लिंगभाव असमानता<br>*प्रा. एस.एस. खेडेकर* | 135-137 |
| 28 | भटक्या-विमुक्त समुदायातील स्त्रियांचे प्रश्न : एक चिकित्सक अभ्यास<br>*अमोल महापुरे* | 138-144 |
| 29 | पितृसत्ता आणि लिंगभाव<br>*डॉ. ज्योती अरविंद पोटे* | 145-149 |
| 30 | नको भेदाभेद<br>*सा. प्रा. सुधाकर कि. माटे* | 150-153 |
| 31 | लिंगभाव असमानता व स्त्री भृणहत्या:समाजशास्त्रीय अभ्यास<br>*प्रा. अखिलेश शिंदे* | 154-157 |
| 32 | लिंगभाव न्याय : आव्हाने आणि उपाय<br>*प्रा. डॉ. दिलीप आर. चव्हाण* | 158-163 |
| 33 | कुटुंब नियोजन :स्त्रियांचा सहभाग आणि लिंगभावात्मक राजकारण<br>*प्रा. रोहोकले मयुर सूर्यभान* | 164-167 |
| 34 | महिलांच्या पुनरुत्पादन आरोग्याचे प्रश्न<br>*कु. स्वरांगी भागवत, कु. प्रतिक्षा रानडे & कु. मानसी मोहिते* | 168-174 |
| 35 | अंध विद्यार्थिनींच्या समस्यांचा अभ्यास<br>*वैशाली अशोक जाधव* | 175-178 |
| 36 | स्वराज्य जननी जिजामाता मालीकेतील स्त्री वेध आणि लिंगभावात्मक अवलोकन<br>*प्रा. डॉ. सीमा शेटे-नवलाखे* | 179-183 |
| 37 | धर्माधिष्टीत लिंगभाव असमानता : भारतीय लोकशाही समोरील आव्हान<br>*डॉ. अविनाश वर्धन* | 184-189 |

38 **भारतीय समाजातील लिंगभाव असमानतेचा चिकित्सक अभ्यास** 190-193
*भावसार तन्मय प्रभाकर आणि डॉ. कावळे बंडु नानाभाऊ*

39 **ग्रामीण स्त्री सक्षमीकरण** 194-196
*प्रा. सिताराम कचरू मोगल*

40 **लिंगभाव : असमानता आणि वर्जिततेचे प्रश्न सातारा जिल्हयातील कोरेगांव तालुक्यातील शेतमजूर महिलांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास** 197-200
*डॉ. संध्या अरूण पौडमल*

41 **IMPACT OF CYBERCRIME ON WOMEN** 201-204
*Dr. Savita Madhavrao Gire*

# लिंगभाव : असमानता आणि वर्जिततेचे प्रश्न सातारा जिल्हयातील कोरेगांव तालुक्यातील शेतमजूर महिलांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास

**डॉ. संध्या अरूण पौडमल**

*प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊर, ता. कोरेगांव, जि. सातारा*

**प्रस्तावना**

भारत हा प्राचीन काळापासून खेडयांचा देश आहे असे म्हटले जाते. त्यामुळे खरा भारत आणि भारतीय समाज, लोकजीवन व त्यांच्या समस्या समजून घेण्यासाठी भारतीय जीवनाचा व खेडयात राहणा-या बहुसंख्य स्त्री-पुरूषांच्या जीवनाचा व राहणीमानाचा अभ्यास करावा लागेल.

भारतात पितृसत्ताक कुटुंब पध्दतीच्या प्रभावामुळे सर्व अधिकार पुरूषांच्या हाती केंद्रित झाले असल्यामुळे महिलांचे क्षेत्र अजूनही मर्यादित आहे. शेतीला पूरक अशी कामे महिलांना शेतमजूरांसारखी करावी लागतात. लवकरात लवकर मुलीचे लग्न करण्याची घाई तिच्या कुटुंबाला असते तर सून शेतीला उपयोगी पडली पाहिजे हा दृष्टिकोन तिच्या सासरच्यांचा असतो. महिलेने शेतीत भरपूर मनुष्यबळ पुरवावे म्हणून तिला मुलगा झाला पाहिजे, मुले झाली नाहीत तर पुरूष दुसरा विवाह करीत. एकाच कुटुंबात भावा बहीणींना समान वागणूक मिळत नाही. मुलांच्या खाण्यापिण्याकडे, आरोग्याकडे, कपडेलत्ते याकडे जितके लक्ष दिले जाते तितके लक्ष मुलीकडे, महिलांकडे दिले जात नाही. तसेच दारिद्रयामुळे व कुटुंबाच्या पालनपोषणासाठी महिलांना शेतमजूर शेतात काम करून मजूरी मिळवतात व आपल्या प्रपंचाचा गाडा मोठया कष्टाने चालवितात.

21 व्या शतकात शेतीचे यांत्रिकीकरण आणि आधुनिकीकरण मोठया प्रमाणात होत असले तरी शेतातील अनेक कामे उदा. बीया टोकणे, भांगलण करणे, छाटणी करणे यासारखी अनेक कामे आजही शेतमजूरांच्या सहकार्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाहीत. तसेच भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशात बेकारांना सामावून घेण्याची क्षमता ही भारतीय शेतीतच आहे. त्यामुळे भारतातील शेती आणि शतमजूर एकमेकांना पूरक आहेत, असे म्हणावे लागेल. शेतमजूर म्हणून स्त्री आणि पुरूष असे गट पडतात. प्रस्तुत लघु निबंधामध्ये स्त्रीयांसंदर्भात शेतमजूर म्हणून काम करणा-या महिलांच्या ज्या अनेक समस्या आहेत त्यांचा अभ्यास केला आहे.

**संशोधन आराखडा :**

प्रस्तुत अभ्यास विषय पूर्ण करण्यासाठी ओीयास विषयाच्या अन्वेशणात्मक व निदानात्मक आराखडयाचा अवलंब करण्यात आला आहे. अभ्यास विषय हा सातारा जिल्हयातील तथ्य संकलनासाठी अभ्यासक प्रश्नसूची, मुलाखत, निरीक्षण, साहित्य सर्वेक्षण, अनुभव सर्वेक्षण व तथ्य संकलन इ. साधनांवर करण्यात आला आहे. यात नमुना सर्वेक्षणाचाही वापर करण्यात आला आहे. एकूण 142 गावांपैकी 25गावांमधील 150 शेतमजूर महिलांची अभ्यासासाठी निवड करण्यात प्रथम आली. प्रथम मुलाखत घेतली या तत्वानुसार शेतमजूर महिलांची निवड केली.

**उद्दिष्ये :**

सातारा जिल्हयातील ग्रामीण भागात क्रातीकारक बदल होताना दिसतात अनेक पिक पध्दती बी-बियाणे, मशागत इ. मध्ये सुधारणा घडून येत असलेल्या दिसून येतात परंतू शेतमजूरांच्या अधिकतेत कोणत्याही सुधारणा करण्यात आली नाही.

1) शेतमजूर महिलांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास केलेला आहे.
2) शेतमजूर महिलाचा मिळणा-या वेतनाचा अभ्यास करणे म्हणजे किमान वेतन कायद्यानुसार त्यांना वेतन मिळते का? ते तपासलेले आहे.

**गृहितके :**

1) प्रस्तुत शोध निबंधामध्ये सातारा जिल्हयातील कोरेगांव तालुक्यातील शेतमजूर महिलांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करतांना खालील गृहीतके मानलेली आहेत.

2) भारतीय राज्यघटनेने स्त्री पुरूषांच्या समानतेला मान्यता दिलेली असली तरी समाज मात्र त्यांच्या भूमिकांमध्ये व कार्यक्षेत्रामध्ये काटेकोरपणे फरक करतो.
3) महिला आणि पुरूष शेतमजूरांच्या वेतनात भेदीााव केला जातो.
4) महिला शेतमजूरांना सामाजिकदृष्टया गौण मानले जाते व त्यांचे समाजातील स्थान गौण असते.

**महिला शेतमजूरीचे स्वरूप :**

कोरेगांव तालुक्यातील अनेक महिला शेतमजूरांना ब-यच ठिकाणी प्रासंगिक मजू म्हणून काम करावे लागते, उदा. धान्याची मळणी करणे, रोपे लावणे, खुरपणे, मशागत करणे, भांगलणे अशा स्वरूपातील कामे करावी लागतात. खुदाईच्या कामात महिला शेतमजूर पुरूष मजूरांना मदत करण्याचे काम करतात. तसेच शेतातील कामाऐवजी घरी बसून घरगुती कामे करावी लागतात. त्यांना सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त होत असते मात्र शेती व्यवसायाशी निगडीत असणारी कामे उदा. धान्य वाळविणे बी-बियाणे स्वच्छ करणे, भाड सडणे, तुरी बडविणे, तूर निवडणे इ. कामे महिलांनाच करावी लागतात.

महिला शेतमजूरांचा पुरवठा खालील कारणांमुळे मोठया प्रमाणात नियंत्रित केला जातो.

1) महिला शेतमजूरांना हलक्या कामात गुंतविले जाते.
2) शेतीसाठीच्या हंगामाच्या व सुगीच्या काळात महिला शेतमजूरीचा भरपुर पुरवठा केला जातो. तसाच तो बिगर हंगामात जरूरी नसल्यामुळे कमीही करता येतो.
3) महिला शेतमजूरांच्या पुरवठयावर नियंत्रण ठेवणारा महत्वाचा घटक म्हणजे सामाजिक भावना व जाती पध्दती या घटकांचा प्रस्ताव मुख्यत्वेकरून शेतक-यांच्या कुटुंबातील मजूरांवर होतो कारण शेतमजूरी करणाःया महिला मुख्यत्वेकरून मागासलेल्या व अनुसूचित जातीतल्या असतात, किंवा गरीब कुंबातील असतात. त्यामुळे घराबाहेरील कामे करू नयेत अशी भावना नसते या प्रवर्गातून महिला शेतमजूरांचा पुरवठा प्रमाणात हेत असतो. कुटुंबाच्या मिळकतीत हातभार लावण्याच्या दृष्टीने व केवळ गरज म्हणून त्या महिला शेतमजूरीची कामे करतत. ग्रामीण समाजातील उच्च स्तरावरील व उच्चभ्रू मंडळींकडूनही महिलांच्या घराबाहेरील म्हणजेच शेतमजूरीच्या कामाला विरोध दर्शविला जातो.

**शेतमजूरीकडे वळण्याच्या कारणांचा शोध :**

शेतमजूरीकडे वळण्याच्या कारणांचा शोध घेतला असता असे दिसून आले की, एकूण 150 महिलांच्या मुलाखतीवरून कुटुंबात पुरेसा रोजगार नसल्याने 41 महिला शेतमजूरी करतात त्याची टक्केवारी 27.33 आहे. स्वतःची पुरेशी शेती नसल्यामुळे 16 महिला शेतमजूरी करतात त्याची टक्केवारी 10.67 आहे. तर 31 महिला शेतमजूर स्वतःची पुरेशी शेती नसल्यामुळे शेतमजूरी करतात. त्यांची टक्केवारी 22.67 आहे. शिक्षणाचा अभाव असल्यामुळे 22.00 टक्के म्हणजेच 33 महिला शेतमजूरी करतात. त्याचबरोबर 29 मलिा दुसरे काम मिळत नसल्याने शेतमजूरी करतात. त्यांची टक्केवारी 19.33 आहे. याचा अर्थ कोरेगांव तालुक्यातील महिला शेतमजूरांना आपल्या कौटुंबिक व आर्थिक गरजा भागविण्यासाठी विविध कारणांनी शेतमजूरी करावी लागते.

**महिला शेतमजूरांना मिळणारी मजुरी :**

महिला शेतमजूरांना मिळणारी मजूरीची रक्कम कामाच्या स्वरूपानुसार वेगवेगळी आहे. 57 महिलांना रू. 80 ते 100 मिळते तर 46 महिला शेतमजूरांना 100 ते 120 मजूरी मिळते. तसेच 47 महिला मजूरांना 120 ते 150 मजूरी मिळते. केवळ 24.00 टक् महिलांच्या गरजा या मजूरीतून पूर्ण होण्यास मदत होते तर 76.00 टक्के म्हणजेच 114 महिलांच्या दैनंदिन गरजा या मिळणा-या मजूरीच्या रक्कमेतून भागत नाहीत.

**शेतमजूर महिलांसमोरील समस्या :**

भारतात अजूनही स्त्रीयांची कुटुंबातील गृहीणी आणि माता ही भूमिका प्रधान मानली जाते. स्त्रीयांच्या मनावरही गृहीणी या भूमिकेचा किंवा कौटुंबिक जबाबदारीचा आदर्श मोठा आहे. आज शहरी भागात देखील नोकरी करणा-या हजारो महिलांना कामावरून घरी परत येतांना पदर खेचून केंव्हा एकदा आपल्या ख-या कामाला

सुरूवात करतो असे मनोमन वाटत असते. त्यामुळे ग्रामीण भागात देखील या दृष्टीकोनातून बदल झालेला नाही. त्यामुळे घराबाहेर पैशासाठी स्त्रीने कष्टाची कामे करणे कमीपणाचे मानले जाते. परंतू समाजाची बदलत चाललेली स्थिती लक्षात घेता आज स्त्री व पुरूष या दोघांना संसाराचा गाडा चालवितांना कुटुंबाची जबाबदारी पेलतांना स्त्रीयांना कामानिमित्त घराबाहेर पडावेच लागत आहे. परंतू कामाच्या स्वरूपात केलेल्या विभाजनामुळे स्त्रीला गौणत्व प्राप्त झालेले आहे. वास्तविक पाहता स्त्रीया पुरूषांच्या बरोबरीने काम करतांना दिसत असल्या तरी तिच्या काही मर्यादा आहेत. याची सतत जाणीव समाजातून केली जाते. स्त्रीयांचे काम सर्रास निमकुशलतेचे समजले जात असल्यामुळे त्याचा त्यांच्या वेतनावरही परिणाम होत असलेला दिसून येतो. यासाठी स्त्री शेतमजूरांच्या समस्यांचे काही विशेष पैलू ध्यानात घेणे आवश्यक आहेत, ज्यामध्ये स्त्रीयांवर असलेला कुटुंब पोषणाचा तसेच कामाचा दुहेरी भार, स्त्री कामगारांचे अदृश्यत्व, स्त्रीयांच्या कामाची स्थिती आणि स्त्री कामगारांच्या कामाबाबत केला जाणारा भेदभाव या गोष्टींचा समावेश आहे. यातूनच समान काम, समान वेतन या मार्गदर्शक तत्वांचा पुरस्कार करण्यात आला असला तरी सार्वजनिक क्षेत्रातला रोजगार वगळता भारतात खाजगी उद्योगात व विशेषतः असंघटित क्षेत्रातील (शेतमजूर) स्त्रीयांना कमी वेतन दिले जाते. शिवाय कामाचे स्वरूप लक्षात घेता असुरक्षितता ही गोष्ट प्रकर्षाने जाणवते. त्यांना कामाच्या ठिकाणी कोणत्याही सोयी सुविधा पुरविल्या जात नाहीत. तरीही विनातक्रार त्या आपल्या कुटुंबाच्या आर्थिकतेत हातभार लावत असलेल्या दिसून येतात. कोरेगांव तालुक्यातील शेतमजूर महिलांच्या मुलाखती घेतांना एका गोष्टीची प्रकर्षाने जाणीव झाली की त्यांना तुमच्या समस्या काय? असे विचारले असता, त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारचा योग्य प्रतिसाद मिळाला नाही. परंतु तुम्हाला रोजगारांच्या ठिकाणी कोणकोणत्या सोयी सुविधा उपलब्ध आहेत हे विचारल्यानंतर त्यांनी हळूहळू आपल्या कामाच्या ठिकाणच्या अडचणी सांगायला सुरूवात केली.

**समाजाचा शेतमजूर म्हणून पाहण्याचा दृष्टीकोन :**

संघटीत क्षेत्रात काम करणा-या किंवा नोकरदार स्त्रीयांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन उच्च मानला जातो. परंतु असंघटित क्षेत्रात विशेषतः शेतमजूर म्हणून काम करणा-या महिलांकडे समाज हा श्रमजीवी म्हणूनच पहात असतो. त्यामुळे साहजिकच त्यांच्या मनात न्यूनत्वाची भावना तयार होताना दिसते.

**आर्थिक समस्या :**

शेतमजूर स्त्रीयांची सर्वात महत्वाची समस्या म्हणजे आर्थिकता, स्त्रीया आर्थिकदृष्टया जरी सक्षम असल्या तरी मिळणा-या रोजगारावर त्यांचा पूर्ण हक्क अजूनही नाही. शिवाय मिळालेल्या पैशाच्या खर्चाच्या संदर्भात स्वतंत्र्य नाहीत. त्यामुळे पुरेसा पैसा गाठीशी रहात नाही. काही महिलांचे पती व्यसनाधीन असल्याने त्यांना मिळणा-या पैशातून कशी बचत करतो हे देखील सांगितले पण ही संख्या त्या मानाने खूप कमी आहे.

**महिला शेतमजूरांचे प्रश्न सोडविणेसाठी शासनाच्या विविध योजना :**

शासनाच्या विविध योजना ग्रामीण भागात येत आहेत. जसे की, 1) इंदिरा गांधी भूमिहीन वृद्ध शेतमजूर सहाय्य योजना 1991 2) एकात्मिक बाल विकास कार्यक्रम 3) जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सातारा 4) एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम. अशाप्रकारे कोरेगाव तालुक्यातील शेतमजूर महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी शासकीय पातळीवर, सातारा जिल्हा पातळीवर आणि सातारा तालुका पंचायत समिती या सर्वाच्या माध्यमातून अनेक प्रयत्न करण्यात येत आहेत. या सर्व शासकीय यंत्रणाबरोबरच काही सामाजिक संस्थाही ग्रामीण महिला शेतमजूरांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.

**निष्कर्ष :**

1) घरकाम सांभाळून कौटुंबिक, आर्थिक समस्या सोडवण्यासाठी महिला शेत मजूरी करतात.
2) शेती क्षेत्रातील कोरेगाव तालुक्यातील महिला शेतमजूर असंघटीत श्रमिक असल्यामुळे त्यांच्या कार्याची उपेक्षा होते. शेतमजूरीमध्ये, वेतनामध्ये फरक जाणवतो. कमी वेतनावर जास्तीत जास्त

कामे करुन घेतली जातात. प्रसंगी शेताच्या मालकाकडून दबाव व दरारा असल्यामुळे तो त्यांना ती शेतीची कामे मुकाटयाने करावी लागतात.

3) समान काम समान वेतन हे कायद्याने समानेचे तत्व अवलंबले असले तरी महिला शेतमजूरांना पुरुष शेतमजूरांपेक्षा तुलनेने कमी वेतन मिळते. महिला शेतमजूरांना काम मात्र पुरुषांच्या बरोबरीने करावे लागते.

4) समाजातील उच्चवर्णीयांपेक्षा मागास, दलित व आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील समाजातून शेतमजूरी करणा-या महिलांचे प्रमाण अधिक आहे.

5) मिळणा-या मजुरीपेक्षा अद्यापही बचतीचे प्रमाण अत्यंत कमी आहे. महिला बचत गटात अद्यापही महिला शेतमजूरांना कमी सहभाग आहे.

6) महिलांसाठी कोणकोणत्या शासकीय योजना आहेत याची माहिती त्यांना नाही.

**शिफारशी**

1) ग्रामीण भागातील शेतमजूरी करणा-या महिलांचा विकास साधण्यासाठी तसेच आर्थिक कौटुंबिक आणि सामाजिक समस्या दूर व्हाव्यात व परिस्थिती सुधारावी म्हणून महाराष्ट्र शासनाने अनेक उपाययोजना केलेल्या आहेत. पण शेतमजूरांच्या स्थितीत विशेष फरक पडला नाही. याचे मुख्य कारण म्हणजे अनेक शासकीय योजना चांगल्या असूनही त्यांची अंमलबजावणी परिणामकारकपणे किंवा योग्य रितीने झालेली नाही. शासकीय कर्मचारी आणि शेतमजूर यांच्यातील समन्वयाचा अभाव दूर करावा व शेतमजूरांसाठीच्या योजना, कायदे यांची प्रभावी व कार्यक्षम अंमलबजावणी करावी.

2) महिला शेतमजूरांना आर्थिक समस्या दूर करणेसाठी लघु उद्योगांसाठी प्रोत्साहन दिले जावे.

3) ग्रामीण महिलांमध्ये शिक्षणाच्या साक्षरतेचा प्रचार व प्रसार करावा व महिलांना त्यांच्या हक्कांची जाणीव करुन देण्यास सुशिक्षीत महिला व संघटनांनी पुढाकार घ्यावा.

4) महिला बचत गटांचे महत्व समजावून देवून बचतीस प्राधान्य द्यावे व बचत गटांची संख्या वाढवावी.

5) किमान वेतन कायद्याची अंमलबजावणी काटेकोरपणे होते की, नाही याची पाहणी करावी.

6) संघटीत क्षेत्रात मिळणारे लाभ - सामाजिक सुरक्षा विमा, रजा, निवृत्तीवेतन महिला शेतमजूरांना मिळण्यासाठी विशेष कायदे करण्यात यावे.

7) महिला शेतमजूरांच्या संघटना स्थापन केल्या जाव्यात.

8) महिला शेतमजूरांच्या सामाजिक, आर्थिक परिस्थितीचा सखोल अभ्यास करण्यासाठी जिल्हा व राज्य पातळीवर समित्या नेमाव्यात आणि त्यांच्या शिफारशी विचारात घेवून महिला शेतमजूरांच्या विकासासाठी विविध कार्यक्रम राबवावेत व महिलांना आर्थिक सवलती दयाव्यात.

**संदर्भ ग्रंथसूची :**

1) कविमंडन, डॉ.विजय : '*कृषी अर्थशास्त्र*, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर

2) देशमुख, डॉ. प्रभाकर : '*श्रमाचे अर्थशास्त्र* विद्या प्रकाशन, नागपूर : 2, 25

3) महाराष्ट्र शासन : *श्रमशक्ती आयोगाचा अहवाल 1989*

4) योजना जानेवारी ते ऑक्टोंबर 2004

5) समाज प्रबोधन पत्रिका, एप्रिल-जून 2008

6) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन - सातारा जिल्हा 2011- 2012

7) पाटील, प्रा.शांता व पाटील डॉ. लिला : '*कृषी अर्थशास्त्राची मूलतत्वे*, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर 1980

8) Women Labour in India - http ://elangoias.com.